दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — रविवार, दि. १८ जानेवारी, २०२६ — वर्ष - १ अंक - ११६ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

जीवनात यश मिळवायचे असेल तर केवळ स्वप्ने पाहणे पुरेसे नसते, त्या स्वप्नांना दिशा देणारा प्रयत्न आवश्यक असतो. अपयश हे थांबण्याचे कारण नसून, नव्याने उभे राहण्याची संधी असते.

## अत्याचार : ४० दिवसांत निकाल

**अहमदाबाद** : राजकोट जिल्ह्यातील अटकोट तालुक्यात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात विशेष न्यायालयाने आरोपी रेमसिंह दुडवा याला फाशीची शिक्षा सुनावली. एफआयआरपासून निकालापर्यंत अवघ्या ४० दिवसांत न्यायप्रक्रिया पूर्ण झाली. डीएनए व तांत्रिक पुराव्यांमुळे गुन्हा सिद्ध झाला. जलद तपास, प्रभावी अभियोजन आणि दररोज चालवलेल्या खटल्यामुळे पीडितेला वेळेत न्याय मिळाला. हा निकाल गुन्हेगारांना कडक इशारा देणारा ठरला आहे.

## सारांश वृत्त

### ट्रम्प यांना मिळाला नोबेल पुरस्कार

**मुंबई :** संपूर्ण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अखेर नोबेल पुरस्कार मिळाला. व्हाईट हाऊसमध्ये व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांनी डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान मारिया कोरिना मचाडो यांनी ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार दिल्याचे म्हटले जात आहे. गेल्या महिन्यात मचाडो यांना व्हेनेझुएलातील हुकूमशाहीविरुद्धच्या अटळ लढ्यासाठी शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत आठ युद्धे थांबवल्याचा दावा केला आहे. ज्यामध्ये भारत-पाकिस्तान संघर्षाचाही समावेश आहे. त्या बदल्यात ट्रम्प यांनी वारंवार नोबेल शांतता पुरस्काराची मागणी केली होती.

### भाजपाची जम्मूमध्ये बैठक

**जम्मू :** भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आगामी मतदान प्रक्रियेवर चर्चा करण्यासाठी जम्मू-काश्मीर शाखेने शनिवारी येथे बैठक घेतली. त्रिकुटा नगर येथील पक्षाच्या मुख्यालयात राष्ट्रीय परिषद सदस्य आणि राज्य परिषद सदस्यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली आणि "संघटन पर्व" च्या बॅनरखाली देशभरात सुरू असलेल्या संघटनात्मक निवडणुकांचा एक भाग होती, असे प्रवक्त्याने सांगितले. भाजपने शुक्रवारी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले.

### पत्रकारांची संरक्षणाची मागणी

**ढाका :** बांगलादेशातील दोन प्रमुख राष्ट्रीय दैनिकांवर जमावाने नुकत्याच केलेल्या हल्ल्यांनंतर पत्रकार, संपादक आणि मीडिया आउटलेटच्या मालकांनी शनिवारी अधिकाऱ्यांना त्यांचे संरक्षण करण्याची मागणी केली. ते म्हणाले की, नोबेल शांतता पुरस्कार विजेते मुहम्मद युनुस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारमध्ये दक्षिण आशियाई देशातील मीडिया उद्योगाला पद्धतशीरपणे लक्ष्य केले जात आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सविस्तर माहिती

# मुंबई महापौरपदाबाबत अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपा-शिवसेना यांच्या महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. त्यानंतर आता मुंबईचा महापौर कोण होणार? ही चर्चा सुरु झाली आहे. महापौरपदासाठी भाजपा आणि शिवसेना यांचा अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला असेल का? या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे. आम्ही आणि एकनाथ शिंदे बसवून याबाबत निर्णय घेऊ. महापौर कोण? महापौर कधी? महापौर किती वर्ष? या सर्व गोष्टी मी आणि एकनाथ शिंदे तसंच दोन्हीकडची आमची नेतेमंडळी बसवून ठरवू. त्यात कोणताही वाद होणार नाही. आम्ही दोन्ही पक्ष छान पद्धतीनं मुंबई चालवून दाखवू, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

महापौर निवड प्रक्रियेबाबत लॉटरी पद्धतीने निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्र नगरविकास मंत्रालय बीएमसी आणि इतर महानगरपालिकांसाठी महापौरांच्या आरक्षणासाठी लॉटरी काढणार आहे. ही लॉटरी पुढील आठवड्यात काढली जाईल. निवडून येणाऱ्या महापौरांची जात बीएमसी आणि इतर महानगरपालिकांद्वारे निश्चित केली जाईल. उदाहरणार्थ, जर मुंबईच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण गटाची लॉटरी निघाली. खुल्या गटातील कोणी विजयी झाला, तर भाजप खुल्या गटातील विजयी उमेदवाराला महापौर म्हणून नियुक्त करेल. उर्वरित महानगरपालिकांसाठी महापौरांची निवडही अशाच पद्धतीने केली जाईल. ८९ जागांसह भाजप मुंबईत महापौर निवडण्यासाठी सज्ज आहे. या प्रकरणाबाबत भाजपच्या गटात चर्चा सुरू झाल्या आहेत.

### दोन्ही पक्ष एकत्रितपणे प्रशासनचालवतील

● या निकालानंतर आता मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. महापौरपदाबाबत शिवसेनेतील काही नवनिर्वाचित नगरसेवक आणि नेत्यांनी आपली अपेक्षा व्यक्त केली होती. यावर प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, त्यांनी कोणताही वाद होणार नसल्याचे स्पष्ट केले. महापौरपदाचा निर्णय एकनाथ शिंदे, मी आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, असे त्यांनी सांगितले. मुंबई महापौरपदाबाबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली जाईल.

लॉटरीची वाट पाहिली जात आहे. शिंदे सेनेचे अनेक नेते महापौरपदावर दावा सांगू इच्छित आहेत. त्यांचे नेते एकनाथ शिंदे यांना अडीच वर्षांच्या फॉर्म्युल्यावर भाजपशी वाटाघाटी करण्यास उद्युक्त करत आहेत. मुंबई महानगरपालिकेतील २२७ पैकी ११८ जागा महायुती पक्षाने जिंकल्या. ८९ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला २९ जागा मिळाल्या.

दरम्यान, भारतीय जनता पार्टी शिवसेना (एकनाथ शिंदे ) पक्षाचे नगरसेवक फोडून त्यांचा महापौर करेल, असा दावा ठाकरे यांनी केला आहे. माझा पक्ष तोडून माझाच मुख्यमंत्री बनवला होता. तसंच त्यांचा पक्ष तोडून ते महापौर बनणार का? हे पाहूया. मला वाटतंय ते त्यांचा पक्ष तोडून महापौर बनवतील, असा खळबळजनक दावा ठाकरे यांनी केला.

# शिवशक्तीने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला !

### उद्धव ठाकरे यांची भाजपावर घणाघाती टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : मुंबई मुंबईमध्ये आमचा महापौर व्हावा, अशी आमची इच्छा होती आणि आजही आहे. तो आकडा आम्ही आज गाठू शकलेलो नाही, पण सत्ताधाऱ्यांच्या खेळाला उत्तर देऊन जे काही यश शिवशक्तीने मिळवले आहे, त्याने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला आहे. त्यांनी एक्झिट पोलचे आकडे असोत किंवा इतर प्रयत्न, शिवसेना नामोहरम करण्यासाठी एकही कसर सोडली नाही, अशा शब्दांमध्ये शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी (दि. 17) पत्रकार परिषदेत मुंबई महानगरपालिका निवडणूक निकालावर भाष्य केले. सत्ताधाऱ्यांच्या खेळाला उत्तर देऊन जे काही यश शिवशक्तीने मिळवले आहे, त्याने सत्ताधारी पक्षाला घाम फोडला आहे. भाजपने कागदावर शिवसेना संपवली असेल; पण जमिनीवरची शिवसेना ते संपवू शकत नाहीत. हे महापालिका निकालांनी दाखवून दिले आहे. भाजप हा पक्ष कागदावर आहे, साध्या शिवसैनिकांनी प्रचंड पैशाच्या धबधब्यासमोर निष्ठा दाखवत कशी ताठ मानेने लढू शकते, हे दाखवून दिले आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, त्यांचा विजय डागाळलेला आहे. ज्याच्या आधारावर ते महापौर बनवणार आहेत, त्यांना लाज वाटली पाहिजे. मी मधल्या काळात भाजपला ॲनाकोंडा म्हणालो होतो. मला माझ्या शिवसेनेचा अभिमान आहे, असेही त्यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

# नवनीत राणांची पक्षातून हकालपट्टी करा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्या वेतनाची १.६० लाखांची रक्कम जप्त करून केली परतफेड

**जळगाव** : गुरुवारी झालेल्या मनपा निवडणुकीत भाजपला केवळ 25 जागांवर विजय मिळाला आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत ही संख्या फार कमी आहे. त्यामुळे भाजपच्या कामगिरीनंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चा सुरु झाल्या आहेत. अशात आता भाजपच्या काही पराभूत उमेदवारांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. नवनीत राणा यांच्यामुळे अमरावतीत भाजपला नुकसान झाले, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. तसेच नवनीत राणा यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणीही त्यांनी या पत्रात केली आहे. नवनीत राणा यांनी भाजप मजबूत असलेल्या प्रभागांत स्वतःचे उमेदवार टाकून पॅनेल वर वरवंटा कसा फिरवला जाईल, याचे नियोजन केले. तसेच त्यांनी भाजपच्या सर्व पोस्टर्स वर स्वतःचा मोठा फोटो टाकून घेतला. डॉ. धांडे यांचा वापर करून अधिकृत उमेदवारांची उमेदवारी मागे घेतल्याचे पत्र काढून त्या पत्राचा वापर शहरभर केला, असा आरोप पत्रात करण्यात आला आहे. नवनीत राणा यांनी उघडपणे भाजपच्या विरोधात युवा स्वाभिमानच्या उमेदवाराचा प्रचार केला. भाजपचे उमेदवार डमी आणि युवा स्वाभिमानचे उमेदवार हेच खरे असे त्यांनी सांगितले. प्रत्येक ठिकाणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आशीर्वाद असल्याचे सांगितले.

## महाराष्ट्रातील शहरी राजकारणात मोठा बदल

# भाजपने जिंकल्या तब्बल १४२५ जागा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका जाहीर झाल्या आहेत आणि भारतीय जनता पक्षाने (भाजप) शहरी भागात अपवादात्मक कामगिरी केली आहे. राज्यातील २९ महापालिकांपैकी अनेक महानगरपालिकांमध्ये अव्वल पक्ष म्हणून भाजपने आपली सत्ता दृढ केली आहे. एकंदरीत २,८६९ पार्षद जागांपैकी जवळपास अर्धी म्हणजे १,४२५ जागा भाजपच्या तिकिटावर जिंकल्या गेल्या आहेत. ही आकडेवारी या मतदारांच्या बदलत्या मनोवृत्तीची स्पष्ट साक्ष देतात. पारंपरिकपणे मुंबई, पुणे किंवा पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांमध्ये विरोधी पक्षांची मजबूत पकड असतानाही भाजपने त्या भागातही मोठ्या प्रमाणावर यश मिळवले आहे. शहरी निवडणुकांमध्ये मतदार स्थानिक विकास, पायाभूत सुविधांचे काम, वाहतूक आणि रोजच्या जीवनाशी निगडित प्रश्न अधिक महत्त्वाचे मानतात, असे दिसून आले आहे. या मुद्द्यांवर भाजपचा आक्रमक प्रचार आणि स्पष्ट धोरणांचे आश्वासन मतदारांना भावले असल्याचे जाणवते. भाजपच्या या कामगिरीचा अर्थ असा की शहरांमध्ये पक्षाच्या धोरणांची मान्यता मिळाली आहे. शहरांचे नागरिक आता स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमता, विकास आणि सुधारित समस्या निवारण या विषयांवर मतदान करत आहेत. यामुळे राजकीय समीकरण बदलले असून विरोधी पक्षांसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. विरोधी पक्षांमध्ये काही प्रमाणात असमर्थता आणि धोरणात्मक विसंगती दिसून येतेय. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने शहरी समस्यांवर स्पष्ट आणि ठोस दृष्टिकोन मांडण्यात कमी भर दिला असल्याचे टिप्पण्यांमध्ये दिसते. शिवसेना पक्षाची पारंपरिक पकडही या निवडणुकीत तितकी झळकत नाही, ज्यामुळे नागरिकांची पसंती भाजपकडे झुकली आहे. शहरी मतदारांचा निर्णय आता फक्त पक्षावर आधारित नसून त्यांच्या विशिष्ट गरजांवर आधारित होत आहे. नागरिक सुविधाजनक जीवन, सुरक्षितता, जलद वाहतूक, पाणीपुरवठा आणि स्वच्छ प्रशासन यांसारख्या मुद्द्यांवर अधिक भर देत आहेत. हे मुद्दे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष जाणवणाऱ्या समस्या असल्यामुळे त्यांचे मत कार्यक्षमतेकडे वळले आहे. भाजपच्या या विजयाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो फक्त एका महानगरपालिकेपुरता मर्यादित नाही. पुणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, धुळे, जळगाव आणि सोलापूरसारख्या शहरांमध्येही भाजपने मजबूत कामगिरी केली आहे. त्यामुळे शहरी महाराष्ट्रात भाजपची वाढती पकड हे व्यापक राजकीय ट्रेंडचे द्योतक आहे. भाजपच्या कामगिरीमुळे आता राज्यातील विरोधी पक्षांना आपल्या धोरणांचा पुनर्विचार करावा लागणार आहे.

# माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना जिल्हा सत्र न्यायालयाकडून दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अंबाजोगाई** : जगमित्र शुगर्स या प्रस्तावित कारखान्यासाठी जमीन खरेदी प्रकरणात माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांच्या सह तिघांविरुद्ध फसवणूक केल्याच्या खटल्यात अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. त्यावर अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात हा खटला पुन्हा सुरू करण्याचा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने तो खटला पुनरुज्जीवित करण्याच्या दिलेल्या निर्णयावर धनंजय मुंडे यांनी केलेल्या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर स्थगिती दिली आहे.

न्यायालयात धनंजय मुंडे यांच्या वतीने त्यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी स्थगिती अर्ज दाखल केला होता. धनंजय मुंडे यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपील दाखल करे पर्यंत किंवा अपिलाची मुदत पूर्ण होई पर्यंत हा खटला चालविण्यास अंबाजोगाई अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने ही स्थगिती दिली आहे. 2011-12 साली खरेदी केलेल्या या जमिनीच्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्या विरोधात बर्दापूर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली होतीश. तत्कालीन परिस्थितीत पोलिसांनी तपास करून तक्रारीत तथ्य न आढळल्याने गुन्हा दाखल केला नाही, त्यानंतर उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

या खटल्यात दोन्ही पक्षांचे म्हणणे, साक्ष, पुरावे इत्यादी वस्तुस्थिती पाहून अंबाजोगाई न्यायालयाने धनंजय मुंडे व अन्य तिघांना दोषमुक्त केले होते. मात्र त्याविरुद्ध जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यावर धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केलेल्या अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे न्यायालयाने ऐकल्यानंतर स्थगिती देण्यात आली असून, श्री मुंडे यांना अपील करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे.

न्यायालयाचा स्थगिती निकाल स्वयंस्पष्ट असून तो न्यायालयाच्या पोर्टलवर देखील उपलब्ध आहे. मात्र याबाबत अर्धवट माहितीच्या आधारे कुणीतरी खोडसाळपणाने चुकीचे वृत्त प्रसिद्ध केले असून, संबंधितास कायदेशीर नोटीस पाठवणार असल्याचे मुंडे यांचे वकील ॲड. अशोक कवडे यांनी सांगितले आहे.

### चार पक्षांच्या शहराध्यक्षांना मतदारांनी नाकारले

**पुणे** : पुणे महानगरपालिकेचा निकाल जाहीर झाला असून या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जोरदार मुसंडी मारत १६५ पैकी तब्बल १२० जागांवर विजय मिळवला आहे. या निकालामुळे पुण्यात भाजपचे एकहाती वर्चस्व प्रस्थापित झाले असून, इतर पक्षांना मोठा धक्का बसला आहे. विशेषतः उपमुख्यमंत्री अजित पवार गटाला अपेक्षेपेक्षा अत्यंत खराब कामगिरीला सामोरे जावे लागले असून, अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. या निवडणुकीत सहा प्रमुख राजकीय पक्षांचे शहराध्यक्ष थेट निवडणूक रिंगणात उतरले होते. मात्र या हाय-प्रोफाइल लढतींमध्ये मतदारांनी अनपेक्षित कौल दिला.

# पुणे ग्रँड चॅलेंज टूरनिमित्त १९ जानेवारीला पुण्यातील शाळा-महाविद्यालयांना सुट्टी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहरात १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६' च्या पार्श्वभूमीवर, सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी शहरातील प्रमुख भागांतील शाळा, महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत.

या स्पर्धेतील 'प्रोलॉग रेस' सोमवार, १९ जानेवारी रोजी पुणे शहरात होणार असून, या रेससाठी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत शहरातील प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये फर्ग्युसन कॉलेज रोड (एफ.सी. रोड), गणेशखिंड रोड, जंगली महाराज रस्ता (जे.एम. रोड) तसेच या मार्गांना जोडणारे सर्व उपरस्ते यांचा समावेश आहे. या मार्गांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेता, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि पालकांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

या आदेशानुसार पुणे पालिकेच्या छत्रपती शिवाजीनगर-घोले रोड, विश्रामबागवाडा-कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध-बाणेर, कोथरूड-बावधन, सिंहगड रोड तसेच वारजे-कर्वेनगर या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील सर्व अंगणवाड्या, शासकीय व खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये तसेच व्यावसायिक शिक्षण संस्था सोमवार, १९ जानेवारी रोजी पूर्णतः बंद राहणार आहेत.

दरम्यान, ही सुट्टी फक्त एकाच दिवसापुरती असून मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ पासून सर्व शैक्षणिक संस्था नियमित वेळेनुसार सुरू राहतील, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पुणे ग्रँड चॅलेंज टूरसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेमुळे शहराची जागतिक पातळीवर ओळख वाढणार आहे.

## आधुनिक, वेगवान आणि सुरक्षित रेल्वे प्रवासाच्या दिशेने पाऊल

# हावडा–गुवाहाटी मार्गावर देशातील पहिली स्लीपर वंदे भारत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मालदा** : अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेली स्लीपर वंदे भारत एक्सप्रेस अखेर सुरू झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम बंगालमधील मालदा टाउन स्थानकावरून हावडा ते गुवाहाटी (कामाख्या) दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. अत्याधुनिक सुविधा, वेग आणि आरामदायी प्रवास यामुळे ही गाडी सुरू होण्यापूर्वीपासूनच चर्चेत होती. पंतप्रधान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, स्लीपर वंदे भारत ट्रेन आधुनिक भारताच्या वाढत्या वाहतूक गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहे. ही पूर्णपणे वातानुकूलित ट्रेन असून कमी खर्चात हवाई प्रवासासारखा अनुभव देण्याचा तिचा उद्देश आहे. पारंपरिक गाड्यांच्या तुलनेत या ट्रेनमधील स्लीपिंग बर्थ अधिक आरामदायी असतील, असा दावा करण्यात आला आहे. हावडा–गुवाहाटी मार्गावर या गाडीमुळे प्रवासाचा वेळ सुमारे अडीच तासांनी कमी होणार आहे. सध्या या मार्गावरील सराईघाट एक्सप्रेसला सुमारे १७ तास लागतात, तर वंदे भारत स्लीपर ट्रेनचा नियोजित प्रवासकाल १४ तासांचा असेल. यामुळे ईशान्य भारताकडे होणारा धार्मिक प्रवास, पर्यटन तसेच व्यावसायिक हालचालींना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. या स्लीपर वंदे भारत ट्रेनमध्ये एकूण १६ वातानुकूलित डबे आहेत. त्यामध्ये एक एसी फर्स्ट क्लास, चार एसी टू-टियर आणि ११ एसी थ्री-टियर डब्यांचा समावेश आहे. या ट्रेनची एकूण प्रवासी क्षमता सुमारे ८२३ इतकी आहे. स्वदेशी तंत्रज्ञानाने तयार करण्यात आलेल्या या गाडीने कोटा–नागदा मार्गावर घेतलेल्या उच्चगती चाचणीत ताशी १८० किलोमीटर वेग गाठला होता, अशी माहिती रेल्वेच्या अधिकृत निवेदनात देण्यात आली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी स्लीपर वंदे भारतमध्ये अनेक सुधारित सुविधा देण्यात आल्या आहेत. रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी शरीराला योग्य आधार देणाऱ्या एर्गोनॉमिक स्लीपिंग बर्थची रचना करण्यात आली आहे. डब्यांदरम्यान स्वयंचलित दरवाजे असून त्यामुळे ट्रेनमध्ये सुरक्षित आणि सुलभ हालचाल शक्य होणार आहे. याशिवाय, सामान ठेवण्यासाठी सुनियोजित जागा, यूएसबी चार्जिंग पोर्ट, अद्ययावत सुरक्षा यंत्रणा, दिव्यांग प्रवाशांसाठी सोयीस्कर व्यवस्था, मॉड्यूलर पॅन्ट्री आणि प्रगत अग्निसुरक्षा प्रणाली या ट्रेनमध्ये उपलब्ध असणार आहेत. सर्व डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, आपत्कालीन परिस्थितीत थेट रेल्वे कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्यासाठी टॉक-बॅक प्रणालीही देण्यात आली आहे. हावडा–गुवाहाटी मार्गावर सुरू झालेली ही स्लीपर वंदे भारत एक्सप्रेस भविष्यात देशातील इतर प्रमुख लांब पल्ल्याच्या मार्गांवरही धावणार असल्याचे संकेत रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. आधुनिक, वेगवान आणि सुरक्षित रेल्वे प्रवासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# 1 एप्रिलपासून टोल नाके कॅशलेस ; फक्त फास्टॅग अन् युपीआय चालणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**दिल्ली** : देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. येत्या 1 एप्रिल 2026 पासून देशातील सर्व टोल प्लाझा पूर्णपणे कॅशलेस होणार आहेत. याचाच अर्थ, 1 एप्रिलनंतर टोल भरण्यासाठी रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही. केवळ आणि हे दोनच पर्याय प्रवाशांसाठी उपलब्ध असतील. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, टोल नाक्यांवरील मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी आणि वाहतूक कोंडी फोडण्यासाठी कॅश लेन पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत टोल नाक्यावर किमान एक लेन रोख पेमेंटसाठी खुली असायची, ती आता कायमची बंद होईल. जर तुमच्याकडे वैध फास्टॅग नसेल किंवा त्यात शिल्लक नसेल, तर तुम्हाला दंड म्हणून टोलची 1.25 पट रक्कम युपीआय द्वारे भरावी लागेल. हा निर्णय म्हणजे भविष्यातील बॅरियर-फ्री टोलिंग आणि आधारित टोल प्रणालीच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. यामुळे रोख व्यवहारामुळे टोल नाक्यांवर लागणाऱ्या लांबच लांब रांगा आता इतिहास जमा होतील. वारंवार थांबणे आणि गाडी सुरू करणे यामुळे होणारी इंधनाची नासाडी थांबेल.

# भारत–युरोपीय संघ व्यापार करार!

**जागतिक व्यापारातील अनिश्चितता, संरक्षणवाद आणि भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर भारत–युरोपीय संघ मुक्त व्यापार करार पुन्हा निर्णायक टप्प्यावर आला आहे. हा करार केवळ आर्थिक नव्हे, तर भारताच्या दीर्घकालीन धोरणात्मक वाटचालीचा कस ठरणार आहे.**




भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील मुक्त व्यापार कराराची चर्चा आज पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे. गेली अनेक वर्षे कागदावर फिरणारी, तांत्रिक मुद्द्यांत अडकलेली ही चर्चा आता निर्णायक टप्प्याकडे सरकत असल्याचे संकेत मिळत आहेत. जागतिक व्यापाराच्या बदलत्या संदर्भात पाहिले, तर हा करार केवळ दोन अर्थव्यवस्थांमधील व्यवहारापुरता मर्यादित नाही, तर भारताच्या दीर्घकालीन आर्थिक आणि धोरणात्मक भूमिकेशी जोडलेला आहे. आजचे जागतिक वातावरण अस्थिर आहे. व्यापारयुद्धे, संरक्षणवाद, भू-राजकीय संघर्ष आणि ऊर्जा-संसाधनांवरील तणाव यामुळे नियमाधारित जागतिक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा वेळी भारतासाठी विविध बाजारपेठांशी सुसंगत संबंध निर्माण करणे अपरिहार्य ठरते. युरोपीय संघ हा जगातील सर्वात मोठ्या आणि स्थिर बाजारांपैकी एक आहे. २७ देशांचा हा संघ, प्रगत तंत्रज्ञान, उच्च खरेदी क्षमता आणि नियमबद्ध व्यापारासाठी ओळखला जातो. भारतासाठी या बाजाराशी सखोल करार म्हणजे निर्यातीसाठी नवी दारे उघडण्यासारखे आहे. भारताची अर्थव्यवस्था आज वेगाने वाढत असली, तरी निर्यातीत अपेक्षित झेप अद्याप मिळालेली नाही. उत्पादन क्षेत्राला चालना देणे, 'मेक इन इंडिया'ला जागतिक स्तरावर नेणे आणि रोजगारनिर्मिती वाढवणे, ही उद्दिष्टे गाठण्यासाठी मोठ्या आणि विश्वासार्ह बाजारपेठेची गरज आहे. युरोपीय संघाशी मुक्त व्यापार करार झाल्यास वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी उत्पादने, माहिती तंत्रज्ञान सेवा, तसेच हरित ऊर्जा आणि डिजिटल सेवांसाठी मोठी संधी उपलब्ध होऊ शकते. विशेषतः लघु आणि मध्यम उद्योगांसाठी हा करार महत्त्वाचा ठरू शकतो, कारण त्यांना स्थिर मागणी असलेल्या बाजारात प्रवेश मिळू शकतो. या कराराचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे गुंतवणूक. युरोपीय कंपन्या दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी ओळखल्या जातात. भारतात पायाभूत सुविधा, स्वच्छ ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहनं, संशोधन आणि विकास या क्षेत्रांत युरोपीय गुंतवणूक वाढू शकते. याचा फायदा केवळ भांडवलापुरता मर्यादित न राहता तंत्रज्ञान हस्तांतरण आणि कौशल्यविकासापर्यंत पोहोचू शकतो. पर्यावरणीय निकष, कार्बन उत्सर्जनावर आधारित शुल्क, कामगार हक्क, बौद्धिक संपदा यांसारख्या विषयांवर युरोपीय संघाची भूमिका कडक आहे. भारतासाठी हे निकष स्वीकारताना आपल्या उद्योगांची स्पर्धात्मकता टिकवणे हे आव्हान आहे. विशेषतः कार्बन करासारख्या उपाययोजनांमुळे भारतीय उद्योगांवर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडू शकतो. त्यामुळे करार करताना भारताला आपल्या हितांचे संरक्षण करण्यासाठी स्पष्ट आणि ठाम भूमिका घ्यावी लागेल. या कराराकडे केवळ आर्थिक गणित म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हा करार भारताच्या परराष्ट्र धोरणाशीही जोडलेला आहे. अमेरिका, चीन, रशिया यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर युरोपशी जवळीक वाढवणे भारतासाठी संतुलन साधणारे पाऊल ठरू शकते. यामुळे भारताची जागतिक पातळीवरील विश्वासार्हता वाढेल आणि 'मल्टी-अलायनमेंट' धोरणाला बळ मिळेल. युरोपसाठीही भारत महत्त्वाचा भागीदार आहे, कारण आशियातील स्थिर आणि लोकशाहीप्रधान देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. मुक्त व्यापार करारांबाबत भारतात कायमच शंका आणि भीती व्यक्त केली जाते. स्थानिक उद्योगांचे नुकसान होईल, शेतकऱ्यांवर परिणाम होईल, अशी चिंता स्वाभाविक आहे. मात्र अनुभव सांगतो की योग्य अटी, संक्रमण कालावधी आणि संरक्षणात्मक उपायांसह करार केले, तर त्याचा लाभ दीर्घकाळात दिसतो. महत्त्वाचे म्हणजे, करारानंतरही देशांतर्गत सुधारणा, कौशल्यविकास आणि उद्योगांना सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू राहिले पाहिजेत. युरोपीय संघाशी मुक्त व्यापार करार हा संधीचा दरवाजा उघडू शकतो, पण तो किती उपयोगात आणायचा, हे भारताच्या तयारीवर अवलंबून आहे. केवळ करारावर स्वाक्षरी करून चालणार नाही; त्यानंतरची अंमलबजावणी, धोरणात्मक सातत्य आणि उद्योग-सरकार यांच्यातील समन्वय निर्णायक ठरेल. त्यामुळेच हा करार 'वेळेची गरज' आहे, पण त्याहून अधिक तो भारताच्या आत्मविश्वासाची आणि दूरदृष्टीची कसोटी आहे.

## संपादकीय

### वाढती ताकद, वाढती जबाबदारी



**महाराष्ट्रातील महापालिकांमध्ये भाजपने जवळपास निम्मी सत्ता आपल्या ताब्यात घेतली आहे. हा आकडा राजकीय विजय दर्शवत नाही, तर तो शहरी कारभाराची मोठी जबाबदारीही अधोरेखित करतो. या सत्ताकेंद्रातून विकास घडतो की लोकशाहीतील समतोल ढासळतो, याची कसोटी आता सुरू झाली आहे.**

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांचे चित्र पाहिले, तर शहरी राजकारणात झालेला बदल ठळकपणे जाणवतो. जवळपास निम्म्या कॉर्पोरेटर जागांवर भाजपची उपस्थिती ही एखाद्या निवडणुकीत मिळालेली आकडेवारी नसून, गेल्या दशकभरात घडत गेलेल्या राजकीय प्रक्रियेचा परिणाम आहे. शहरांमध्ये भाजप आता पर्याय उरलेला नाही; तो केंद्रस्थानी पोहोचलेला पक्ष बनला आहे. महापालिका निवडणुका या मोठ्या घोषणा किंवा राष्ट्रीय मुद्द्यांवर लढवल्या जात नाहीत. रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूक कोंडी, घरबांधणी, स्थानिक भ्रष्टाचार हे प्रश्न मतदारांच्या रोजच्या अनुभवाशी जोडलेले असतात. अशा निवडणुकांमध्ये भाजपने आपली पकड मजबूत केली, याचा अर्थ मतदारांनी किमान प्रशासनाच्या क्षमतेबाबत तरी त्याच्यावर विश्वास दाखवला आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूरसारख्या शहरांतील यश हे अचानक मिळालेले नाही. ते सातत्याने उभ्या केलेल्या संघटनात्मक रचनेचे आणि स्थानिक पातळीवर तयार केलेल्या नेतृत्वाचे फलित आहे. याच्या उलट चित्र विरोधी पक्षांचे आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शहरी राजकारणात दिशाहीन झाल्याचे दिसते. एकेकाळी शहरांमध्ये प्रभावी असलेली त्यांची पकड ढिली पडली, कारण बदलत्या शहरी प्रश्नांना ते ठोस उत्तर देऊ शकले नाहीत. शिवसेनेची पारंपरिक शहरी ताकदही फाटाफुटीमुळे कमकुवत झाली. परिणामी, विरोधी पक्षांची भूमिका सत्तेला आव्हान देणारी न राहता प्रतिक्रियात्मक बनली आहे. हा रिकामा अवकाश भाजपसाठी सोयीचा ठरला. तथापि, जवळपास ५० टक्के महापालिका जागा मिळाल्या म्हणजे भाजपसाठी पुढचा प्रवास सोपा होईल, असे मानणे चूक ठरेल. उलट ही स्थिती अधिक जबाबदारीची आहे. पाणी, सार्वजनिक वाहतूक, प्रदूषण, झोपडपट्टी पुनर्विकास, शिक्षण आणि आरोग्य सुविधा या सगळ्या प्रश्नांवर आता थेट सत्ताधाऱ्यांनाच उत्तर द्यावे लागणार आहे. अपेक्षा वाढलेल्या असताना अपयशासाठी सबबी कमी असतात, हे शहरी मतदार वारंवार दाखवून देतो. एकाच पक्षाकडे मोठ्या प्रमाणात स्थानिक सत्ता एकवटणे हा लोकशाहीसाठी विचाराचा विषय आहे. सत्तेचे केंद्रीकरण कार्यक्षमतेसाठी उपयोगी ठरू शकते, पण त्याच वेळी स्थानिक स्वायत्ततेवर मर्यादा येण्याचा धोका असतो. महापालिका या राज्य सरकारच्या शाखा नसून स्वतंत्र लोकशाही संस्था आहेत, ही जाणीव सत्ताधाऱ्यांनी ठेवली नाही, तर नाराजीला वेळ लागणार नाही. भाजपचा शहरी विस्तार हा बदलत्या मतदार मानसिकतेचा आरसा आहे. शहरांचा विस्तार, स्थलांतर, मध्यमवर्गाचा वाढता प्रभाव आणि सुविधा-केंद्रित अपेक्षा यामुळे राजकारणाची भाषा बदलली आहे. या बदलाशी भाजप जुळवून घेण्यात यशस्वी ठरला आहे, तर इतर पक्ष अजूनही जुन्याच चौकटीत अडकलेले दिसतात. आज महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात "एक पक्ष, अर्धी सत्ता" हे वास्तव आहे. मात्र हे वास्तव कायमस्वरूपी नाही. शहरांमध्ये शेवटी रस्ते, पाणी आणि प्रशासनच बोलते. कामगिरी टिकली, तर सत्ता टिकते; अन्यथा शहरांचा मतदार फार वेळ देत नाही. पुढील काही वर्षांत ही सत्ता संख्येने मोठी ठरते की गुणवत्तेने, याची कसोटी लागणार आहे. या सत्ताकेंद्रित चित्राचा आणखी एक पैलू दुर्लक्षित करून चालणार नाही. भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे स्थानिक राजकारणात मतभेदांची धार बोथट होण्याचा धोका आहे. सक्षम विरोधक नसतील, तर निर्णयप्रक्रिया एकांगी होण्याची शक्यता वाढते. महापालिकांमध्ये चर्चा, प्रश्नोत्तर आणि सार्वजनिक दबाव हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक असतात. ते कमजोर झाले, तर सत्ताधाऱ्यांनाच त्याची किंमत मोजावी लागते. विरोधी पक्षांसाठीही ही वेळ आत्मपरीक्षणाची आहे. केवळ केंद्र किंवा राज्य सरकारविरोधी घोषणांवर शहर जिंकता येत नाही. स्थानिक नेतृत्व, विश्वसनीय कार्यक्रम आणि शहरी प्रश्नांवरील स्पष्ट भूमिका याशिवाय पर्याय उभा राहणार नाही. शहरी राजकारणातली पुढची लढाई आकड्यांची नव्हे, तर विश्वासाची असेल.
-

# आयाराम-गयारामांचा खेळ : कुठे हनुमान उडी यशस्वी, तर कुठे तोंडावर आपटी

**तिकिटासाठी पक्षांतराचा धडाका; काही बंडखोरांना मतदारांची पसंती, तर संधीसाधूपणावर मतपेटीतून नकार**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यंदा राजकीय पक्षांत उमेदवारीवरून मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाल्याचे चित्र दिसून आले. तिकिट न मिळाल्याने किंवा अपेक्षा पूर्ण न झाल्याने अनेक इच्छुकांनी ऐनवेळी पक्ष बदलण्याचा मार्ग स्वीकारला. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात उडी मारणारे हे आयाराम-गयाराम काही ठिकाणी यशस्वी ठरले, तर काही ठिकाणी मतदारांनी त्यांच्या संधीसाधूपणावर थेट नकाराची मोहोर उमटवली.

उमेदवारी जाहीर होण्याच्या आधी आणि नंतर अनेक प्रभागांत नाट्यमय घडामोडी घडल्या. कालपर्यंत एका पक्षाचे झेंडे खांद्यावर घेऊन फिरणारे नेते दुसऱ्याच दिवशी प्रतिस्पर्धी पक्षाच्या व्यासपीठावर दिसू लागले. काही ठिकाणी या पक्षांतराला 'रणनीती' म्हणून मांडले गेले, तर काहींनी खुलेपणाने नाराजी व्यक्त करत बंडाचा झेंडा उभारला. परिणामी, निवडणूक रणांगणात उमेदवारांची संख्या वाढली आणि लढत अधिक चुरशीची बनली.

मतदानातून मात्र मतदारांनी स्पष्ट संदेश दिला. ज्या उमेदवारांनी स्थानिक कामांचा ठसा उमटवला होता, जनसंपर्क मजबूत होता आणि पक्ष बदलण्यामागे ठोस कारणे मांडली, त्यांना मतदारांनी स्वीकारले. काही ठिकाणी अशा आयाराम-गयारामांनी 'हनुमान उडी' घेत विजय मिळवला. पक्ष कोणताही असो, उमेदवाराला ओळखणारा आणि विश्वासार्ह मानणारा मतदार त्यांच्या पाठीशी उभा राहिला.

मात्र, अनेक प्रभागांत केवळ तिकिट मिळवण्यासाठी पक्ष बदलणाऱ्यांना मतदारांनी सपशेल नाकारले. "आज हा पक्ष, उद्या तो पक्ष" अशी प्रतिमा असलेल्या उमेदवारांवर मतदारांचा विश्वास बसला नाही. अशा ठिकाणी आयाराम-गयारामांची उडी थेट तोंडावर आपटल्याचे चित्र दिसून आले. या निकालातून मतदारांनी संधीसाधूपणा आणि वैचारिक गोंधळाला नकार दिल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

एकूणच, यंदाच्या महापालिका निवडणुकीत आयाराम-गयारामांच्या राजकारणाला मतदारांनी मिश्र प्रतिसाद दिला. व्यक्तीपेक्षा पक्ष महत्त्वाचा की पक्षापेक्षा व्यक्ती, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अंतिम निर्णय मतदारांच्या परिपक्वतेनेच ठरल्याचे या निकालांतून स्पष्ट झाले.

## 'जनतेचा कौल मान्य, विश्वास मिळवण्यासाठी दुप्पट जोमानं काम करू'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**महापालिका निकालानंतर अजित पवारांची प्रतिक्रिया**

**पुणे :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाला असून, या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मोठे यश मिळवले आहे. राज्यातील २९ पैकी जवळपास २५ महापालिकांवर भाजप-युतीने सत्ता स्थापन केली आहे. मात्र, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महत्त्वाच्या महापालिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

या दोन्ही महापालिकांमध्ये सत्ता काबीज करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही गट एकत्र आले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढूनही पुणेकरांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही. परिणामी, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना या निकालातून मोठा राजकीय धक्का बसल्याचे चित्र आहे.

महापालिका निवडणुकीतील अपयशानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'एक्स' (ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रतिक्रिया दिली. "जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो. विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचं मनापासून अभिनंदन करतो आणि पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो. ज्या ठिकाणी अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू," असे अजित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# काँग्रेसचा 'हात' पकडूनही नामुष्की... पुण्यात ठाकरे ब्रँड गारद

**महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसला दिलासा, मात्र शिवसेना (ठाकरे)–मनसेसाठी आघाडी ठरली तोट्याची**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीत यंदा राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदललेली दिसून आली. काँग्रेस पक्षाने शिवसेना (ठाकरे गट) बरोबर केलेल्या आघाडीमुळे काँग्रेसला मागील निवडणुकीच्या तुलनेत काहीसा दिलासा मिळाला असला, तरी या आघाडीचा सर्वाधिक फटका ठाकरे ब्रँडला बसल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेसचा 'हात' पकडूनही शिवसेना (ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अपेक्षित यश मिळू शकले नाही. परिणामी, पुण्यात ठाकरे ब्रँडची पकड मोठ्या प्रमाणात ढासळल्याचे चित्र दिसून आले.

मागील महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने स्वबळावर लढत दिली होती. त्यावेळी काँग्रेसला जेमतेम आठ जागांवर समाधान मानावे लागले होते. यंदा मात्र शिवसेना (ठाकरे) बरोबर आघाडी केल्याने काँग्रेसच्या जागांमध्ये काही प्रमाणात वाढ झाली. यामुळे काँग्रेसला राजकीय दिलासा मिळाल्याचे बोलले जात आहे. स्थानिक पातळीवरील पारंपरिक मतदार, तसेच काही प्रभागांत आघाडीचा लाभ काँग्रेसला झाला, हे निकालातून स्पष्ट झाले.

मात्र, हीच आघाडी शिवसेना (ठाकरे) आणि मनसेसाठी फारशी लाभदायक ठरली नाही. पुण्यात पूर्वी शिवसेनेचा एक स्वतंत्र मतदारवर्ग होता. ठाकरे गटाच्या विभाजनानंतर हा मतदारवर्ग मोठ्या प्रमाणात संभ्रमात गेला.

काँग्रेससोबत केलेली आघाडी ही पारंपरिक शिवसैनिकांना फारशी रुचली नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. याचा थेट परिणाम मतांवर झाला आणि अनेक प्रभागांत ठाकरे गटाचे उमेदवार पिछाडीवर पडले.

मनसेलाही काँग्रेसच्या आघाडीचा फारसा फायदा झाला नाही. 'स्थानिक मुद्दे आणि स्वतंत्र भूमिका' ही मनसेची ओळख असताना, अप्रत्यक्षपणे काँग्रेससोबत जाणे मतदारांना गोंधळात टाकणारे ठरल्याचे मानले जात आहे. परिणामी, मनसेला अपेक्षित यश मिळू शकले नाही.

### निवडणूक आत्मपरीक्षणाची

- दरम्यान, वंचित बहुजन आघाडी आणि आम आदमी पक्षाला (आप) पुणेकरांनी पूर्णपणे नाकारल्याचे चित्र समोर आले. शहरात प्रचार, उमेदवार आणि मुद्दे असूनही मतदारांनी या दोन्ही पक्षांकडे पाठ फिरवली. त्यामुळे एकही जागा जिंकता न आल्याने या पक्षांचे राजकीय अस्तित्व पुण्यात कमकुवत झाल्याचे स्पष्ट झाले.
- एकूणच, पुणे महानगरपालिका निवडणूक निकालांनी काँग्रेसला मर्यादित दिलासा दिला असला, तरी शिवसेना (ठाकरे) आणि मनसेसाठी ही निवडणूक आत्मपरीक्षणाची ठरली आहे. भाजपच्या तुलनेत विरोधकांचे तुकडे, आघाड्यांतील विसंगती आणि मतदारांमधील संभ्रम याचा फायदा सत्ताधारी पक्षाला झाल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

# सत्ता, संस्था आणि संपत्ती विरुद्ध निष्ठा, ओळख आणि मराठी माणूस : मुंबईचं राजकीय गणित काय सांगतं?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबईचं राजकीय गणित वरकरणी आकड्यांत मांडलं जात असलं, तरी त्यामागची प्रक्रिया, साधनं आणि नैतिकता पाहिली तर हे गणित केवळ निवडणुकीपुरतं राहत नाही. ८८ विरुद्ध ७१ हे आकडे फक्त जागांचे नाहीत, तर दोन भिन्न राजकीय प्रवृत्तींचं, दोन वेगळ्या मूल्यप्रणालींचं आणि दोन विरोधी विचारधारांचं प्रतिनिधित्व करतात. एकीकडे सत्ता, पैसा, संस्था आणि दबाव यांचं अभूतपूर्व एकत्रीकरण दिसतं, तर दुसरीकडे निष्ठा, संघटन, ओळख आणि मराठी माणसावरचा विश्वास.

पहिल्या बाजूचं गणित पाहिलं, तर ते केवळ राजकीय डावपेचांचं नाही, तर एक संपूर्ण यंत्रणा कशी वापरली गेली याचं उदाहरण आहे. पंचवीस वर्षांची युती निर्दयपणे फोडणे, एका पक्षाला छळ, कपट आणि दबावाच्या माध्यमातून तोडणे, उद्धव ठाकरेंसारख्या नेत्याला अक्षरशः राजकीयदृष्ट्या लुबाडणे—या सगळ्या गोष्टी मुंबईच्या राजकारणात अभूतपूर्व होत्या. ईडी, सीबीआय यांसारख्या तपास संस्थांचा वापर, निकाल न देणाऱ्या किंवा प्रलंबित ठेवणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियांचा फायदा, निवडणूक आयोगाची भूमिका, पोलीस यंत्रणेचा दबाव—या सगळ्यांनी मिळून सत्तेचं गणित मजबूत केलं.

यासोबतच अमाप काळा पैसा, सरकारी पैशांतून योजनांची खैरात, धाकधपटशा आणि आर्थिक व्यवस्थापनासाठी लोढा, लाड, कंबोजसारखे फंड मॅनेजर्स यांचा वापर झाला. समृद्धीसारख्या योजनांमधून कमावलेला पैसा, सत्तर हजार कोटींच्या घोटाळ्यांचे आरोप धकवून देण्यासाठी खाल्लेलं कथित कमिशन, मुख्यमंत्री, संपूर्ण मंत्रीमंडळ, खासदार, आमदार आणि केंद्र सरकारचा वरदहस्त—हे सगळं एकाच बाजूला उभं राहिलं.



अदानी-अंबानीसारख्या कॉर्पोरेट शक्ती, चाकर माध्यमं, भडकावू वक्तव्य करणारे राणे आणि सोशल मीडियावरचा जगातला सगळ्यात आक्रमक, घाणेरडा सेल—या सगळ्यांची बेरीज म्हणजे ८८.

पण या प्रचंड यंत्रणेसमोर उभी राहिलेली दुसरी बाजू पाहिली, तर चित्र पूर्णपणे वेगळं आहे. सगळं पळवून नेलेलं असताना, चिन्ह, नाव, सत्ता, पैसा सगळं हिरावून घेतलेलं असताना, नव्यानं संघटन उभारणं हे सोपं नव्हतं. तरीही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ते केलं. चार ठाकरे, निष्ठावान सेना नेते, सामान्य शिवसैनिक आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे फक्त मराठी माणूस—यांच्या जोरावर उभं राहिलेलं गणित म्हणजे ७१.

या ७१ जागा केवळ राजकीय यशाचं प्रतीक नाहीत, तर नैतिक विजयाचं चिन्ह आहेत. सत्ता नसताना, सरकारी यंत्रणा हाताशी नसताना, पैशांचा मारा नसताना मिळालेलं हे समर्थन महत्त्वाचं आहे. मुंबईसारख्या महानगरात, जिथे पैसा, प्रचार आणि प्रभाव मोठी भूमिका बजावतात, तिथे केवळ ओळख, भावनिक नातं आणि निष्ठेच्या जोरावर मिळालेला पाठिंबा दुर्लक्षित करता येणार नाही. म्हणूनच प्रश्न उभा राहतो—फडणवीसांचा विजय डागाळलेला आहे की ठाकरेंचा विजय तेजाळलेला? उत्तर प्रत्येकाने आपापल्या विवेकाने ठरवायचं आहे. आकड्यांवरून पाहिलं तर सत्ता एका बाजूला आहे. पण प्रक्रियेवर, साधनांवर आणि मूल्यांवर नजर टाकली तर दुसऱ्या बाजूचं यश अधिक ठळकपणे समोर येतं.

हे गणित अवघड नाही, असं म्हटलं जातं. खरंच अवघड नाही—फक्त बेरीज-वजाबाकीची नाही, तर नैतिकतेची, लोकशाहीची आणि जनतेच्या विश्वासाची. मुंबईचं हे गणित केवळ आजचं नाही, तर येणाऱ्या काळातील राजकारणाची दिशा ठरवणारं आहे.

## 'सिकल सेल'वर तंत्रज्ञानाची मात; 'एआय'वर आधारित 'सिकल आधार ॲप' विकसित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सिकल सेल ॲनिमियासारख्या गंभीर आणि दीर्घकालीन आजारावर तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रभावी उपाय शोधण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न पुण्यातून पुढे आला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. पूजा दोशी आणि त्यांच्या संशोधक चमूने कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित 'सिकल आधार ॲप' ही एकात्मिक डिजिटल प्रणाली विकसित केली आहे. ही प्रणाली सिकल सेल रुग्णांचे आरोग्य व्यवस्थापन अधिक सोपे, अचूक आणि परिणामकारक बनवण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

सिकल सेल ॲनिमिया हा अनुवंशिक रक्तविकार असून, विशेषतः आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये या आजाराचे प्रमाण अधिक आहे. नियमित तपासणी, औषधोपचार, आहार आणि जीवनशैली व्यवस्थापनाचा अभाव असल्याने अनेक रुग्णांना गुंतागुंतींचा सामना करावा लागतो. याच पार्श्वभूमीवर 'सिकल आधार ॲप' विकसित करण्यात आले आहे.

या ॲपच्या माध्यमातून रुग्णांची वैद्यकीय माहिती, तपासणी अहवाल, औषधांचा इतिहास आणि लक्षणांची नोंद डिजिटल स्वरूपात साठवता येणार आहे. एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने रुग्णाच्या प्रकृतीतील बदलांचे विश्लेषण करून संभाव्य धोके ओळखणे, योग्य वेळी इशारे देणे आणि उपचारांबाबत मार्गदर्शन करणे शक्य होणार आहे. यामुळे डॉक्टर आणि आरोग्य यंत्रणेला वेळेवर आणि अचूक निर्णय घेण्यास मदत मिळेल.

संशोधकांच्या मते, ही प्रणाली केवळ उपचारापुरती मर्यादित न राहता जनजागृती, संशोधन आणि धोरण आखणीसाठीही उपयुक्त ठरेल. सिकल सेल रुग्णांचे जीवनमान उंचावण्यासाठी 'सिकल आधार ॲप' महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास डॉ. पूजा दोशी यांनी व्यक्त केला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मंचरमध्ये वारंवार वीज खंडित

**भवानीनगर :** मंचर शहरात वारंवार होणाऱ्या विजेच्या भारनियमनामुळे नागरिक आणि व्यापारी वर्ग हैराण झाला आहे. कुठलीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. दर गुरुवारी दुरुस्तीच्या नावाखाली दिवसभर वीज बंद ठेवली जाते, त्यामुळे उद्योग-व्यवसायांना मोठा फटका बसत आहे. मागील गुरुवारी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत वीज गायब होती. आठवड्यातील इतर दिवशीही वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांनी महावितरणविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### जुन्नर तालुक्यात राजकीय समीकरणे बदलली

**जुन्नर :** नगरपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर जुन्नर तालुक्यातील राजकारणाला वेगळीच दिशा मिळाली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्ष विजयामुळे पक्षाचा आत्मविश्वास वाढला असून, आमदार शरद सोनवणे यांच्या नेतृत्वामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी इच्छुकांची संख्या वाढली आहे. यामुळे अजित पवार गटातील अतुल बेनके व शरद पवार गटातील सत्यशील शेरकर यांच्यासमोर आव्हान उभे राहिले आहे. भाजप काही प्रमाणात पिछाडीवर असून, तालुक्यातील आगामी निवडणुका अत्यंत चुरशीच्या ठरणार आहेत.

### खेर-पाबळ गटात शिलेदार जाहीर

**आळंदी :** पाबळ जिल्हा परिषद गटात झालेल्या अनपेक्षित राजकीय घडामोडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवार जाहीर केले आहेत. जिल्हा परिषदेसाठी बुद्रुक गावचे माजी सरपंच प्रफुल्ल शिवले, पाबळ पंचायत समिती गणासाठी वंदना प्रकाश पवार तर केंदूर गणासाठी सुचेता सनी थिटे यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या पुढाकारातून ही निवड झाली आहे.

---

**आंबेगावमध्ये अस्वस्थता वाढली; जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकांत समर्थकांना डावलल्याने कार्यकर्त्यांत नाराजी**

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आढळराव पाटील यांचे राजकीय वजन घटतेय का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणी :** एकेकाळी पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट)मध्ये अपेक्षित मानाचे स्थान गमावत आहेत का, असा प्रश्न आंबेगाव तालुक्यासह संपूर्ण उत्तर पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उपस्थित केला जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आढळराव पाटील यांच्या विचारांच्या उमेदवारांना संधी न मिळाल्याने त्यांच्या राजकीय वजनाबाबत शंका व्यक्त होत आहे.

विश्वसनीय सूत्रांनुसार, आंबेगाव तालुक्यातील पारगाव-जारकरवाडी तसेच पेठ-घोडेगाव या जिल्हा परिषद गटांमध्ये आढळराव पाटील यांच्या विचारांचे आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणारे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरावेत, अशी त्यांची व त्यांच्या कार्यकर्त्यांची ठाम भूमिका होती. मात्र प्रत्यक्षात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी वेगळ्या उमेदवारांना संधी दिल्याने आढळराव पाटील यांचा शब्द पक्षात कितपत ग्राह्य धरला जातो, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यापूर्वी मंचर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आढळराव पाटील यांच्या विचारांच्या उमेदवार मोनिका सुनील बाणखेले यांचा पराभव झाला होता. त्या निकालानंतर आढळराव पाटील व त्यांच्या समर्थकांनी पक्षातील काही नेत्यांविरोधात उघड नाराजी व्यक्त केली होती. ही नाराजी कमी करण्यासाठी काही दिवसांपूर्वी मंचर नगरपंचायतीत आढळराव समर्थक सुनील दामोदर बाणखेले यांना स्वीकृत नगरसेवकपद देण्यात आले. त्यामुळे तात्पुरती समजूत काढण्याचा प्रयत्न झाला असला, तरी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नाराजी कितपत शमते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आंबेगाव तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या पारगाव-जारकरवाडी जिल्हा परिषद गटात आढळराव पाटील यांचे कट्टर समर्थक अरुण गिरे यांना उमेदवारी मिळावी, अशी त्यांची इच्छा होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ने या गटात शरद बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. त्याचप्रमाणे आढळराव पाटील यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पेठ-घोडेगाव गटात मंगल नवनाथ हुले यांना उमेदवारी देण्यात आल्याने समर्थकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे. परिणामी, अरुण गिरे हे पारगाव-जारकरवाडी गटातून अपक्ष निवडणूक लढवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीतील पराभवानंतर आढळराव पाटील यांनी लांडेवाडी येथील निवासस्थानी कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात थांबू नये, असा स्पष्ट आग्रह धरला होता. त्यावेळी आढळराव पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला असला, तरी अद्याप त्यांनी कोणताही पक्षांतराचा निर्णय जाहीर केलेला नाही.

दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतही समर्थकांना संधी न मिळाल्याने आता आढळराव पाटील या निवडणुकांत नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ते सक्रिय सहभाग घेणार, तटस्थ राहणार की वेगळा राजकीय निर्णय घेणार, यावर आंबेगाव तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

**आढळरावांच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष**

● एकूणच, आंबेगाव तालुका आणि उत्तर पुणे जिल्ह्यातील सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता, एकेकाळी प्रभावी नेतृत्व करणाऱ्या शिवाजीराव आढळराव पाटील यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय वजन कमी होत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये बळावताना दिसत आहे. पुढील काही दिवसांत ते कोणता निर्णय घेतात, यावर त्यांच्या राजकीय भवितव्याची दिशा ठरणार आहे.

---

## सावरगाव (हिंगेमळा) येथे बिबट्याच्या बछड्यांना जेरबंद; ऊसतोड कामगारांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बनकारफाटा :** सावरगाव (हिंगेमळा), ता. — येथे ऊसतोड सुरू असताना बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. हिंगेमळ्यातील प्रगतशील शेतकरी शरद हिंगे यांच्या शेतामध्ये ऊसतोड कामगार ऊस तोडत असताना अचानक एक मादी बिबट्या आणि तिची दोन बछडे दिसून आली. या घटनेमुळे कामगारांमध्ये घबराट पसरली असून काही काळासाठी ऊसतोडीचे काम थांबवण्यात आले.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, ऊसतोड सुरू असताना मादी बिबट्या कामगारांच्या दिशेने आली. मात्र, गोंधळ उडताच बिबट्या झुडपात पळून गेली. तिच्यासोबत असलेल्या दोन बछड्यांपैकी एक बछडा पळून जाण्यात यशस्वी झाला, तर दुसऱ्या बछड्याला ऊसतोड कामगारांनी आणि सावरगाव येथील ग्रामस्थ तुकाराम ढमढेरे यांच्या मदतीने जेरबंद करण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच सावरगावचे पोलीस पाटील रुपेश जाधव, सरपंच दीपक बाळसराफ तसेच वन विभागाचे अधिकारी महेश बगाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जेरबंद करण्यात आलेल्या बछड्याची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. बछड्याला इजा होणार नाही, याची खबरदारी घेत वन विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली."या परिसरात शेतीसाठी महिला रोज कामावर येतात, तर पुरुष पाणी भरण्यासाठी शेतावर येत असतात. बिबट्यांच्या मुक्त वावरामुळे आमच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या परिसरातील सर्व बिबट्यांना सुरक्षित ठिकाणी हलवावे," अशी मागणी ग्रामस्थांनी केली. ग्रामस्थांच्या मागणीनुसार वनाधिकारी महेश बगाड यांनी तात्काळ वन खात्याशी संपर्क साधून पिंजरा मागवला. ज्या ठिकाणी बछडा आढळून आला होता, त्या ठिकाणी पिंजरा लावण्यात आला. जेरबंद केलेल्या बछड्याला वन विभागाने ताब्यात घेऊन सुरक्षित ठिकाणी हलवले असून, मादी बिबट्या आणि दुसऱ्या बछड्याच्या शोधासाठीही उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. या प्रसंगी समिती उमेदवार संजय वऱ्हाडी, विठ्ठलवाडीचे सरपंच गणेश चव्हाण, सावरगाव ग्रामपंचायतीचे सदस्य आशिष हिंगे, तसेच चंद्रकांत बाळसराफ, शरद हिंगे, संतोष हिंगे, महेंद्र शेलार, आकाश खरात, सागर वाघुले, सुरेश हिंगे आदींसह खिलारवाडी व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे तळेरान येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरास उत्साहात प्रारंभ

**पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन' या संकल्पनेवर आधारित ७ दिवसीय शिबीर**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तळेरान (ता. जुन्नर) |** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन" या संकल्पनेवर आधारित विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन तळेरान, ता. जुन्नर येथे करण्यात आले आहे. या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन बुधवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

शिबिराच्या आयोजनाची माहिती राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र आंबवणे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट यांनी दिली. उद्घाटन समारंभास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. कल्याण सोनावणे तसेच तळेरान गावाचे लोकनियुक्त सरपंच गोविंद साबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व राष्ट्रीय सेवा योजनेच्या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि शिबिरामागील संकल्पना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेंद्र आंबवणे यांनी मांडली. आपल्या मनोगतात त्यांनी शिबिराच्या सात दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, पाणी संवर्धन, पाणलोट क्षेत्र विकास, पडीक जमिनीचे व्यवस्थापन, सामाजिक जनजागृती, आरोग्य व स्वच्छता विषयक उपक्रम तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

## अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात विद्यापीठ प्रतिनिधीपदी आशिष वागळे यांची निवड

**लोकशाही प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विद्यार्थीहितासाठी प्रभावी प्रतिनिधित्वाचे आश्वासन**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे विद्यापीठ प्रतिनिधी पदासाठीची निवडणूक प्रक्रिया अत्यंत उत्साहात आणि लोकशाही मूल्ये जपत पार पडली. या निवडणुकीत विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करत आशिष वागळे यांची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून बहुमताने निवड झाली.

महाविद्यालयातील लोकशाही परंपरा अधोरेखित करणारी ही निवडणूक प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक, शिस्तबद्ध आणि शांततेच्या वातावरणात पार पडली. निवडणुकीपूर्वी सर्व उमेदवारांना समान संधी देण्यात आली होती. उमेदवारांनी आपल्या भूमिका, ध्येयधोरणे आणि आगामी काळातील कार्यप्रणाली विद्यार्थ्यांसमोर मांडली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निवडणुकीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते.

मतदान प्रक्रियेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. तरुणाईचा उत्साह आणि लोकशाही प्रक्रियेतील जागरूकता यावेळी स्पष्टपणे दिसून आली. मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडल्यानंतर आशिष वागळे यांनी बहुमताने विजय मिळवत विद्यापीठ प्रतिनिधीपदावर आपली मोहोर उमटवली. निवडीनंतर महाविद्यालयाच्या वतीने आशिष वागळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

निवडीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना आशिष वागळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, तो मी नक्कीच सार्थ ठरवण्याचा प्रयत्न करेन. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच क्रीडा विषयक समस्या विद्यापीठ पातळीवर प्रभावीपणे मांडून त्यावर मार्ग काढण्यासाठी मी कटिबद्ध राहीन, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, ही निवड विद्यार्थीहितासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास महाविद्यालयाच्या प्राचार्य व प्राध्यापकवर्गाने व्यक्त केला आहे.

---

## दारूच्या दुकानाजवळ युवकाची लूट; मोबाईल हिसकावून तिघे फरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** कारेगाव (ता. शिरुर) येथील हॉटेल शेतकरी परिसरात देशी दारूच्या दुकानाजवळ उभ्या असलेल्या एका युवकाचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून तीन अज्ञात युवकांनी पोबारा केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी अर्जुन गवांदे (वय ३०, सध्या रा. कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे, मूळ रा. खानापूर, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) हे हॉटेल शेतकरी जवळील देशी दारूच्या दुकानाजवळ उभे होते. त्याचवेळी तीन अज्ञात युवक दुचाकीवरून तेथे आले. त्यांनी शिवाजी गवांदे यांच्याशी बोलण्याचा बहाणा करत, "दादा थोडं बाजूला सरका," असे सांगितले. याच क्षणी दोघा युवकांनी शिवाजी यांना पकडून धरले, तर तिसऱ्या युवकाने त्यांच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. अचानक घडलेल्या प्रकारामुळे शिवाजी गवांदे गोंधळून गेले. त्यांनी मोबाईल परत देण्याची मागणी केली असता, आरोपी युवकांनी "तू पोलीस स्टेशनला जा, मग तुला मोबाईल देतो," असे धमकावताच तिघेही युवक त्यांच्या दुचाकीवरून भरधाव वेगाने घटनास्थळावरून निघून गेले. घटनेनंतर शिवाजी गवांदे यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तीन अज्ञात युवकांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळावरील परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून, आरोपींची ओळख पटवण्याचा प्रयत्न पोलिसांकडून केला जात आहे. या घटनेमुळे कारेगाव परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, दारूच्या दुकानाजवळील परिसरात पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

## जमीन बळकावण्यासाठी बनावट दस्त व अंगठे; पारोडीतील धक्कादायक प्रकार उघड

**भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांवर गुन्हे; न्यायालयाच्या आदेशानंतर शिरूर पोलिसांत नोंद**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** शिरूर तालुक्यातील पारोडी गावात भावकीतील वडिलोपार्जित जमीन बळकावण्याच्या उद्देशाने जुन्या दिवसांचे बनावट दस्त तयार करून त्यावर खोटे शिक्के, बनावट अंगठे आणि साक्षीदारांच्या सह्या केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पारोडीचे माजी सरपंच, माजी चेअरमन, माजी उपसरपंच, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह शिरूर भूमिअभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पारोडी येथील पोपट गंगाराम येळे यांच्या कुटुंबाची आजोबांपासून वडिलोपार्जित असलेली जमीन बळकावण्यासाठी आरोपींनी संगनमताने कट रचल्याचा आरोप आहे. माजी सरपंच व माजी चेअरमन चिंतामण विष्णू येळे, माजी उपसरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अविनाश उर्फ बापू चिंतामण येळे यांच्यासह अन्य नातेवाईकांनी शिरूर भूमिअभिलेख कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांच्या मदतीने कागदपत्रांमध्ये छेडछाड केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. आरोपींनी १९६७ सालचा बनावट जबाब नोंदवून घेतल्याचा तसेच भूमिअभिलेख कार्यालयातील शिपाई, अभिलेखपाल आणि भूमापन परिरक्षक यांच्या मदतीने बनावट दस्त तयार करून त्यावर खोटे शासकीय शिक्के उमटविल्याचा आरोप आहे. यासोबतच बनावट साक्षीदार उभे करून त्यांच्या सह्या व अंगठे घेत कागदपत्रे तयार करण्यात आली आणि ही कागदपत्रे थेट पुणे न्यायालयात सादर करण्यात आल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणी पोपट येळे यांनी सातत्याने न्यायालयात आपली बाजू मांडत खरी स्थिती समोर आणली. कागदपत्रांतील विसंगती आणि बनावटपणा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर शिरूर न्यायालयाने संबंधित आरोपींसह दोषी भूमिअभिलेख कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार, पोपट गंगाराम येळे (वय ४८, रा. पारोडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरूर पोलीस ठाण्यात सोपान विष्णू येळे, निवृत्ती विष्णू येळे, चिंतामण विष्णू येळे, सुदाम विष्णू येळे, पांडुरंग विष्णू येळे, अमोल चिंतामण येळे, दिलीप निवृत्ती येळे, अविनाश उर्फ बापू चिंतामण येळे, प्रवीण निवृत्ती येळे, विशाल उर्फ बाबू पांडुरंग येळे यांच्यासह शिरूर भूमिअभिलेख कार्यालयातील शिपाई बेबीनंदा जयचंद्र शिंदे, अभिलेखपाल विनोद व्यंकटेश सूर्यवंशी आणि भूमापन परिरक्षक संतोष नामदेव काळाणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## संघर्षातून घडलेला कोहिनूर हिरा – कुणाल संदीप खोंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील पाबळसारख्या छोट्याशा गावातून उगम पावलेला आणि आज महाराष्ट्रासह देश-विदेशात आपल्या दमदार फलंदाजीची ओळख निर्माण करणारा क्रिकेटपटू म्हणजे कुणाल संदीप खोंड. डावखुरा, आक्रमक आणि तंत्रशुद्ध फलंदाज म्हणून ओळखला जाणारा कुणाल आज टेनिस क्रिकेटमध्ये विक्रमांचा बादशहा ठरत असून त्याची यशोगाथा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

कुणालच्या क्रिकेट प्रवासाची सुरुवात पाबळ येथील श्री भैरवनाथ स्पोर्ट्स क्लब या संघातून झाली. सुरुवातीपासूनच या क्लबने कुणालच्या पाठीशी भक्कमपणे उभं राहत त्याच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवला आणि सातत्याने त्याला प्रोत्साहन दिलं. आजही संपूर्ण भैरवनाथ स्पोर्ट्स क्लब कुणालच्या यशाचा अभिमान बाळगतो. विशेष म्हणजे पाबळ गावात टेनिस क्रिकेट फुल पिचवर खेळण्याची सुरुवात कुणाल संदीप खोंड यांनीच केली. त्यामुळे गावातील क्रिकेट संस्कृतीला नवी दिशा मिळाली आणि अनेक नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळाली. क्रिकेटसाठी कुणालची धडपड आणि जिद्द उल्लेखनीय ठरली.

---

**कान्हूर मेसाईतील समाजकार्याचा योद्धा; संकटात सापडलेल्या ४० कुटुंबांना मिळवून दिली सुमारे १ कोटींची मदत**

## सोशल मिडियातून समाजसेवेचा दीप प्रज्वलित करणारे शहाजी दळवी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिरूर :** शिरूर तालुक्यातील कान्हूर मेसाई गावातील समाजसेवक शहाजी दळवी हे आज समाजसेवेचे नवे, प्रेरणादायी उदाहरण ठरत आहेत. सोशल मिडियाचा सकारात्मक आणि प्रभावी वापर करत त्यांनी कोरोनाकाळापासून आतापर्यंत अपघात, गंभीर आजार व विविध संकटांमध्ये सापडलेल्या सुमारे ४० गरजू कुटुंबांना जवळपास १ कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळवून दिली आहे. त्यांच्या या कार्यामुळे ते अनेकांसाठी खऱ्या अर्थाने "संकटमोचक" ठरले आहेत.

कोरोनासारख्या भीषण संकटाच्या काळात जेव्हा अनेक कुटुंबे हतबल झाली होती, तेव्हा शहाजी दळवी यांनी सोशल मिडियाची ताकद समाजसेवेसाठी वापरण्याचा धाडसी निर्णय घेतला. व्हॉट्सअॅप ग्रुप, फेसबुक व इतर माध्यमांद्वारे केलेल्या आवाहनातून त्यांनी मदतीचे जाळे उभे केले. अपघातग्रस्त कुटुंबे, किडनी ऑपरेशनसाठी झगडणारे रुग्ण, नवजात बालकांच्या वैद्यकीय गरजा, सर्पदंशातील जखमी व्यक्ती, तसेच विविध शस्त्रक्रियांसाठी लागणारा खर्च—अशा अनेक प्रसंगांमध्ये त्यांनी तातडीने मदतीचा हात पुढे केला. "मानवता हाच सर्वात मोठा धर्म" या विचारावर ठाम विश्वास ठेवून शहाजी दळवी हे कार्य करत आहेत. संकटात सापडलेल्या कुटुंबांचे दुःख आपलेच आहे, या भावनेतून सहानुभूती, प्रेम, दया आणि करुणेच्या भावनेतून ते मदत उभी करतात. त्यांच्या एका आवाहनावर नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ, दानशूर व्यक्ती, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच असंख्य व्हॉट्सअॅप ग्रुपमधील सदस्य मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देतात.

या सातत्यपूर्ण सामाजिक कार्यामुळे शहाजी दळवी यांच्या नावाची चर्चा केवळ शिरूर तालुक्यापुरती मर्यादित न राहता पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचली आहे. विविध सामाजिक संस्था, संघटना व नागरिकांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला असून, महाराष्ट्राच्या विविध भागांतून त्यांना शुभेच्छा पत्रे प्राप्त होत आहेत. समाजसेवेपुरतेच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, शेती, वनीकरण, जलसंवर्धन, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यामुळेच समाजात ते "समाजसेवक", "संकटमोचक", "आरोग्यदूत" आणि प्रेमाने "राजे" या नावांनी ओळखले जात आहेत. निस्वार्थ भावनेतून, कोणताही गाजावाजा न करता केलेले शहाजी दळवी यांचे कार्य आज असंख्य तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, समाजासाठी झटणाऱ्या एका खऱ्या योद्ध्याची ओळख निर्माण करत आहे.

## सारांश वृत्त

### काँग्रेसमध्ये दाखल झालेले जगताप विजयी

पुणे : महापालिकेच्या निवडणुकीत राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या वानवडी-साळुंके विहार परिसरातील प्रभाग क्रमांक १८ ड चा निकाल अखेर समोर आला असून, या निकालाने शहरातील राजकीय समीकरणांना नवी दिशा दिली आहे. या प्रभागातून काँग्रेसचे उमेदवार प्रशांत जगताप यांनी भाजपचे अभिजीत शिवरकर यांचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. प्रशांत जगताप यांचा हा विजय केवळ एका प्रभागापुरता मर्यादित नसून, त्यामागे मोठी राजकीय पार्श्वभूमी आहे.

---

### कत्तलीसाठी नेत असलेल्या बैलांची सुटका

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यात भिवकुंड येथे कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या ६ बैलांची सुटका करून पोलिसांनी पिकअप वाहनासह ७.२० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, एक आरोपी फरार आहे. पिकअपमध्ये अमानुषरीत्या बैलांना कोंबून नेले जात असताना पोलिसांनी तातडीने कारवाई करून ६ बैलांची सुटका केली. बैलांची अंदाजे किंमत दीड लाख रुपये, तर पिकअप वाहनाची किंमत ५.७ लाख रुपये आहे.

---

### पाडू यंत्राच्या वापराबाबत माहिती न दिल्याने जयंत पाटील नाराज

सांगली : मुंबईत वापरण्यात येत असलेल्या पाडू यंत्राचा वापर राजकीय पक्षांना माहिती न देता करणे हा निवडणूक आयोगाचा गलथानपणाच असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते आमदार जयंत पाटील यांनी गुरुवारी सांगलीत व्यक्त केले. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, निवडणुकीमध्ये पैशाचा वापर आता सर्वश्रुत झाले आहे. निवडणुकीत पाडू यंत्राचा वापर कशासाठी केला जाणार आहे, हे राजकीय पक्षांना सांगण्याची गरज भासली नाही.

## आमचे निवडक लोक सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील

# अचाट धनशक्तीचा हा विजय!

## मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सैनिकांना पत्र

**मुंबई : यावेळची निवडणूक सोपी नव्हती,तरीही आम्ही अचाट धनशक्ती आणि सत्तेच्या शक्तीला मोठी झुंज दिली आहे ,जे काही निवडक लोक आलेत ते सत्तेला पुरून उरतील ससा विश्वास देत मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र सैनिकांना सावरले आहे.**

राज यांनी एक पात्र लिहून सगळ्यांना धीर दिल आहे. यावेळची निवडणूक ही सोपी नव्हती. अचाट धनशक्ती, सत्तेची शक्ती विरुद्ध शिवशक्ती अशी लढाई होती. पण अशा लढाईत सुद्धा दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम झुंज दिली. त्याबद्दल त्यांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला यावेळेस अपेक्षित यश मिळालं नसलं याचं दुःख आहे, पण म्हणून खचून जाणाऱ्यातले आपण नाही असे ठाकरे यांनी म्हटले आहे. आपले जे नगसेवक निवडून आलेत ते तिथल्या तिथल्या सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील. आणि मराठी माणसाच्या विरोधात काही होत आहे असं दिसलं तर त्या सत्ताधाऱ्यांना जेरीस आणतील हे नक्की.आपली लढाई मराठी माणसाची, मराठी भाषेची , मराठी अस्मितेच्यासाठीची आणि समृद्ध महाराष्ट्रासाठीची लढाई आहे. ही लढाई हेच आपलं अस्तित्व आहे. अशा लढाया या दीर्घकालीन असतात याचं भान तुम्हा सगळ्यांना आहे. बाकी काय चुकलं, काय राहून गेलं, काय कमी पडलं आणि काय करावं लागेल याचं विश्लेषण आणि कृती आपण सगळे मिळून करूच.




### आपला श्वास मराठी

एमएमआर परिसरात असो की एकूणच राज्यात मराठी माणसाला नागवण्याची एकही संधी सत्ताधारी आणि त्यांच्या आश्रयाला गेलेले सोडणार नाहीत. त्यामुळे आपल्या मराठी माणसाच्या पाठीशी आपल्याला ठाम उभं रहायचं आहे. निवडणुका येतील जातील पण आपला श्वास हा मराठी आहे हे विसरायचं नाही असेही आवाहन शेवटी

## घुसखोरीमुळे बंगालची लोकसंख्या बदलली

### मोदींची ममता बॅनर्जी सरकारवर टीका



**मालदा :** पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी जोरदार टीका केली. मोठ्या प्रमाणातील घुसखोरीमुळे राज्याची लोकसंख्यात्मक रचना बदलली असून मालदा आणि मुर्शिदाबादसारख्या जिल्ह्यांत दंगली उसळत असल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधारी पक्षाच्या संरक्षणाखाली सुरू असलेल्या 'सिंडिकेट राज'मुळे ही परिस्थिती बळावल्याचे ते म्हणाले. घुसखोरी हे बंगालसमोरील सर्वात मोठे आव्हान असल्याचे सांगताना पंतप्रधानांनी नमूद केले की, जगातील अनेक विकसित आणि समृद्ध देश बेकायदा स्थलांतर रोखण्यासाठी कठोर पावले उचलत आहेत. त्याचप्रमाणे पश्चिम बंगालमधूनही घुसखोरांना बाहेर काढणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मालदा आणि मुर्शिदाबादमध्ये नुकत्याच घडलेल्या हिंसाचाराच्या घटनांचा उल्लेख करत त्यांनी या प्रश्नाशी त्यांचा थेट संबंध जोडला. तृणमूल काँग्रेसची 'सिंडिकेट' यंत्रणा घुसखोरांना राज्यात स्थायिक करण्यासाठी सक्रिय असल्याचा आरोप करत पंतप्रधानांनी सांगितले की, त्यामुळे अनेक भागांत लोकसंख्यात्मक बदल घडत आहेत. या प्रक्रियेचा थेट परिणाम सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेवर होत असल्याचा दावाही त्यांनी केला. शेजारील बांगलादेशात धार्मिक छळाला सामोरे गेल्यानंतर भारतात आलेल्या मतुआ समुदायाला उद्देशून बोलताना पंतप्रधानांनी आश्वासन दिले की, अशा निर्वासितांनी काळजी करू नये.

## संभाजीनगरमध्ये भाजपच ठरला मोठा भाऊ

### युती तोडणाऱ्या शिवसेनेला जबर फटका



**छ.संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महा पालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या राज्याचं लक्ष लागून राहिलं होतं. ६० टक्के मतदान झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल स्पष्टपणे भाजपच्या बाजूने झुकलेला दिसून आला आहे. शिवसेनेसोबत युती न करता स्वबळावर लढण्याचा निर्णय भाजपसाठी फायदेशीर ठरला, तर हाच निर्णय शिंदे गटाच्या शिवसेनेसाठी अंगलट आला आहे. निकालांचे चित्र स्पष्ट होत असताना भाजप सर्वाधिक जागांवर आघाडी घेतली असून महापालिकेत शतप्रतिशत सत्तेपर्यंत मजल मारली आहे. याउलट, 'आम्हीच मोठा भाऊ' असा दावा करणाऱ्या शिंदेंच्या शिवसेनेला आता लहान भावाच्या भूमिकेत राहावे लागणार आहे. या निवडणुकीत विशेष बाब म्हणजे भाजप, शिंदे गटाची शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी सर्वच पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. कोणतीही औपचारिक युती नसताना देखील भाजपने सर्वाधिक स्ट्राइक रेट राखला. बंडखोरी, अंतर्गत नाराजी आणि तिकीट वाटपावरील असंतोष असूनही भाजपने मतदारांचा विश्वास मिळवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टॉक शो आणि प्रचारसभांमधून विकासकामांचा लेखाजोखा मांडत 'भगव्याची शान राखा' असं थेट आवाहन केलं होतं, त्याला संभाजीनगरच्या मतदारांनी प्रतिसाद दिल्याचं निकालातून दिसून आलं. याउलट, शिंदे गटाच्या शिवसेनेला स्वबळाचा निर्णय महागात पडला.

## रवींद्र चव्हाणांचे ते विधान भाजपला भोवले

**लातूर :** लातूरचे भूमिपुत्र आणि दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्याविषयी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेले वादग्रस्त वक्तव्य लातूरकरांच्या चांगलेच जिव्हारी लागले. त्याचाच वचपा मतदारांनी महानगरपालिका निवडणुकीत भाजपला पराभवाची धूळ चारून काढला. विलासराव देशमुख आणि त्यांच्या स्मृती आजही लातूरकरांच्या हृदयात आहेत, हेच या निकालातून अधोरेखित झाले आहे. दुसरीकडे, आमदार अमित देशमुख यांनी केलेले सूक्ष्म निवडणूक नियोजन आणि जागावाटपातील सोशल इंजिनीअरिंग काँग्रेसच्या विजयासाठी निर्णायक ठरले.

## महापौरपद भाजपकडे तर शिंदेंचा उपमहापौर?

### मुंबईत 28 जानेवारीला महापौर पदाची निवडणूक

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत महायुतीत भाजप मोठा भाऊ ठरला होता. त्यानंतर आता मुंबई महापालिका निवडणुकीतही भाजपच मोठा भाऊ ठरल्याने मुंबईत भाजपचा महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, तर शिंदे सेना दुसऱ्या नंबरवर असल्याने शिंदे सेनेचा उपमहापौर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ठाकरे बंधूंना अपेक्षित यश न मिळाल्याने त्यांना विरोधी पक्षनेतेपदावर समाधान मानावे लागणार आहे. दरम्यान, मुंबईच्या महापौरपदासाठी निवडणूक २८ जानेवारीला होणार आहे. मुंबईचा महापौर भाजपचा की ठाकरे यांच्या शिवसेनेचा यावरून गेल्या काही दिवसांपासून जोरदार चर्चा रंगली होती. अखेर मुंबई महापालिका



निवडणुकीतमहायुती सरस ठरली.मुंबई महानगरपालिकेतील अन्य महत्त्वाच्या पदाचे भाजप व शिंदेंच्या शिवसेनेमध्ये वाटप होणार आहे. यात भाजपला स्थायी समितीसह सुधार समिती या दोन महत्त्वाच्या वैधानिक समित्यांच्या अध्यक्षपदासह सभागृह नेतेपद मिळू शकते, तर शिंदेच्या शिवसेनेला बेस्ट समिती अध्यक्षपदासह शिक्षण समिती अध्यक्षपद मिळण्याची शक्यता आहे. त्याशिवाय आरोग्य, विधी, महिला बालकल्याण, बाजार उद्यान, स्थापत्य (शहर), स्थापत्य (उपनगर) या सहा विशेष समित्यांपैकी चार समित्या भाजपच्या वाट्याला, तर दोन समित्या शिवसेनेच्या मिळण्याची शक्यता आहे.

### पहिल्यांदाच ठाकरे गटाला विरोधी पक्षनेतेपद

महापालिका निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हा पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा असल्यामुळे त्यांना विरोधी पक्षनेतेपद मिळणार आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच विरोधी पक्षनेतेपदी ठाकरेंचा नगरसेवक विराजमान होणार आहे.

## काँग्रेसचा स्वबळाचा करंटेपणा नडला

### मुस्लिमबहुल प्रभाग प्रथमच एमआयएमने खेचले

**मुंबई :** २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीप्रमाणे जर काँग्रेसने उद्धव ठाकरे यांच्यासोबत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आघाडी केली असती, तर आज ठाकरे बंधूंसह काँग्रेसची मुंबई महापालिकेत सत्ता आली असती. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह भाई जगताप अशा काँग्रेस नेत्यांचा स्वबळाचा हट्ट पक्षाला चांगलाच नडला, तसेच ठाकरे बंधूंचा मुंबई महापालिकेच्या सत्तेचा वारू काँग्रेस नेत्यांच्या हट्टामुळे रोखला गेला, हे निवडणूक निकालावरून स्पष्ट होत आहे. लोकसभा आणि



विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीला चांगले यश आले होते. पण केवळ उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्याशी युती करताच वर्षा गायकवाड, भाई जगताप या नेत्यांनी राज ठाकरे यांच्यामुळे उत्तर भारतीयांची मते काँग्रेसला मिळणार नाहीत, अशी भीती काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे व्यक्त केली. तसेच प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मनातही ठसविले. मुंबईत लोकसभेप्रमाणे आघाडी एकसंध राहिली पाहिजे, असे शरद पवार यांनी मुंबई काँग्रेसच्या नेत्यांना बोलावून समजावले. पण मुंबई काँग्रेसच्या नेत्यांचा निर्णय आधीच झाला होता. मुस्लिम आणि दलित मतांचे विभाजन भाजपच्या पथ्यावर पडेल, असा धोका मुंबई काँग्रेसच्या नेत्यांना सांगण्यात आला, पण भाई जगताप आणि वर्षा गायकवाड हे नेते स्वबळाची भाषा करत राहिले. उद्धव ठाकरे हे राहुल गांधी यांच्याशी बोलले. पण काही झाले नाही.

## बहुजन विकास आघाडी व मित्रपक्षांना बहुमत

**वसई :** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुजन विकास आघाडी (बविआ) आणि मित्रपक्षांनी ७१ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. एकूण ११५ जागांपैकी ६६ जागांवर बहुजन विकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले असून, बविआसोबत युती करून निवडणूक लढवलेल्या काँग्रेसला ४ तर मनसेला १ जागा मिळाली आहे. या निवडणुकीत परिवर्तनाचा नारा देत मैदानात उतरलेल्या भाजपला ४३ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेना (शिंदे गट) ला केवळ १ जागा मिळाली. विशेष म्हणजे स्वतंत्रपणे ९५ जागांवर उमेदवार उभे करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तसेच १३ जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (घड्याळ गट) यांना एकही जागा मिळवता आली नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर वसई-विरार महापालिका ताब्यात घेण्याची भाजपची मोठी महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी शिवसेनेसोबत महायुती करत भक्कम व्यूहरचना राबवण्यात आली होती. दुसरीकडे बहुजन विकास आघाडी, काँग्रेस आणि मनसे यांनी एकत्रित आघाडी करून निवडणूक लढवली. या एकजुटीचा फायदा काँग्रेस व मनसेला झाला असून, बहुजन विकास आघाडीची सत्ता पुन्हा एकदा वसई-विरार महापालिकेवर कायम राहिली आहे. आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आपला गड यशस्वीपणे राखत पुन्हा एकदा पक्षाची ताकद सिद्ध केली आहे. अनेक प्रभागांमध्ये चार सदस्यांच्या पॅनलने विजय मिळवत बहुजन विकास आघाडीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या निकालामुळे वसई-विरारमध्ये बहुजन विकास आघाडीची राजकीय पकड अधिक मजबूत झाली असून, आगामी काळात महापालिकेच्या कारभारावर बविआचा ठसा अधिक ठळकपणे दिसणार आहे. वसई-विरार महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल येथील जनता राजकीयदृष्ट्या जागृत असल्याचे स्पष्टपणे सिद्ध करतो. राज्यातील बहुतांश महानगरपालिकांचे निकाल एकांगी लागले असून त्यामध्ये भावनाप्रधानतेचा प्रभाव दिसून येतो. मात्र वसई-विरारच्या निकालाने हे अधोरेखित झाले आहे की, येथील जनतेने पक्ष वा नेत्यांपेक्षा त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून मतदान केले आहे.

## चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचा दणदणीत विजय

**मुंबई :** विदर्भातील चंद्रपूर महापालिकेत भाजपाची सत्ता उलथावून लावण्यात काँग्रेसला यश आले आहे. चंद्रपूर महापालिकेसाठी ५६.८९ टक्के मतदान झाले होते. त्यात १७ प्रभागातील ६६ नगरसेवकपदासाठी निवडणूक झाली. मात्र या निवडणुकीत भाजपाचे नेते सुधीर मुनगंटीवार, भाजपा आमदार किशोर जोरगेवार यांना धक्का बसला आहे. याठिकाणी काँग्रेस आणि भाजपाच्या थेट लढाईत काँग्रेसने बाजी मारली आहे. चंद्रपूर महापालिकेच्या ६६ जागांपैकी भाजपाला २३ जागा शिंदेसेनेला १ जागा तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला २ जागा मिळाल्या आहेत. या महापालिकेत काँग्रेस ३० जागांवर पुढे आहे तर उद्धव ठाकरेंचा पक्षही ६ जागांवर आघाडीवर आहे. त्यामुळे इतरांच्या मदतीने चंद्रपूरात काँग्रेस महापालिकेत सत्ता पालट करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. चंद्रपूर महापालिकेत पहिल्यांदाच उद्धवसेनेचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस व मित्रपक्षांना मिळालेल्या यशावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे.

## सुशासन, विकास आणि पारदर्शकतेचा विजय

### भाजपा प्रदेश कार्यालयात विजयोत्सव साजरा

**मुंबई :** मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वाधिक जागा जिंकत क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. भाजपा-महायुतीच्या विकास, सुशासन आणि पारदर्शक कारभाराला मुंबई आणि इतर महापालिका क्षेत्रातील जनतेने स्पष्ट कौल दिल्याबद्दल मतदारांचे आभार मानतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात साज-या झालेल्या विजयोत्सवावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. विकासाचा अजेंडा घेऊन आम्ही जनतेमध्ये गेलो आणि जनतेने भाजपावर विश्वास ठेवत भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल मतदारांचा आभारी आहे. हा विजय भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला समर्पित आहे अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांच्या अपार मेहनतीचे कौतुक केले. ढोलताशांचा गजर करत, गुलाल उधळत, मिठाई वाटप करत भाजपा नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी विजयोत्सव साजरा केला.



यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माजी खा. डॉ. किरीट सोमय्या, ज्येष्ठ नेते भाई गिरकर, आ. श्रीकांत भारतीय, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, आ. प्रसाद लाड, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जयदीप कवाडे आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. फडणवीस म्हणाले की, जनतेला विकास हवा आहे, प्रामाणिकता हवी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास पुन्हा एकदा या निकालाने स्पष्ट केला आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी होता म्हणून विजय शक्य झाला असेही त्यांनी नमूद केले. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास आणि उन्नती हेच ध्येय ठेवून यापुढेही कार्य केले जाईल असा शब्दही त्यांनी दिला. भाजपाच्या कार्याचा आत्मा, विचारांचा आत्मा हिंदुत्ववाद आहे आणि त्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. आमचे हिंदुत्व हे संकुचित नाही तर जो कोणी भारताच्या संस्कृतीचा मान राखतो तो प्रत्येक जण हिंदू आहे असे आम्ही समजतो असेही श्री. फडणवीस यांनी अधोरेखित केले. जनतेचे प्रेम भाजपाला लाभले आहे

## काँग्रेसचे पाच शहरात महापौर

### 350 नगरसेवक; 10 ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ: हर्षवर्धन सपकाळ

**बुलढाणा :** महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेले यश समाधानकारक नसले तरी यश अपयशाची पर्वा न करता आम्ही वैचारिक लढाई लढलो. जनतेचा विश्वास व कार्यकर्त्यांचा निर्धाराचा लढा या जोरावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत आहे. पाच शहरात काँग्रेसचा महापौर तर ३५० नगरसेवक आणि १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ असे चित्र आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

बुलढाणा येथे प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, संक्रातीच्या पर्वावर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेस राज्यात दुस-या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. जेथे शक्य आहे तेथे स्वबळावर तर काही ठिकाणी आघाडी करून काँग्रेस पक्षाने वैचारिक व संघटनात्मक वाढीसाठी निवडणूक लढली. सत्ताधारी भाजपा महायुतीने पैशाचा प्रचंड वापर केला, बोगस मतदान झाले, कुठलीही तडजोड न करता भाजपाच्या बुलडोझरसमोर काँग्रेस कार्यकर्ता निर्धाराने उभा राहिला. हा कार्यकर्त्यांचा विजय असून लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे, विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. हा काळ संघर्षाचा, वैचारिक लढाईचा आहे आणि काँग्रेस ही लढाई लढण्यास कटीबद्ध आहे. अपशाने खचून न जाता पुढच्या

### मुंबईतील भाजपाचे यश फिक्सिंगमुळे..



मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपाला मिळालेले यश हे जनादेश नसून नियोजनबद्ध फिक्सिंगचा भाग असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केला आहे. प्रभाग रचनेपासून ते मतदान प्रक्रियेतील यंत्रणा, शाईतील घोळ आणि तथाकथित 'पाडू' नावाच्या मशिनपर्यंत सर्व बाबी संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी केला. निवडणूक आयोगाने सावरासावर करण्याची भूमिका सोडून निष्पक्षपणे काम करावे आणि भाजपाच्या इशाऱ्यावर चालणे तात्काळ बंद करावे, अशी मागणीही त्यांनी केली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी भाजपावर जोरदार टीका करताना म्हटले की, भाजपाकडे आता कसलीही नैतिकता किंवा लाज उरलेली नाही. पाकिट वाटप, बोगस मतदारांची नोंद, उमेदवारांची पळवापळवी आणि निवडणूक आयोगाचा गलथान कारभार पाहता या निवडणुका 'फ्री अँड फेअर' झाल्याच नाहीत, हे स्पष्टपणे दिसून येते. लोकशाही खऱ्या अर्थाने संकटात सापडली असून, सत्तेचा गैरवापर करून निकाल आपल्या बाजूने वळवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सपकाळ म्हणाले की, हुकूमशाही हळूहळू वाढत जाते, मात्र एका टप्प्यावर तिचा फुगा फुटतो. आता तो क्षण जवळ आला असून भाजपासाठी आणि त्यांच्या मित्रपक्षांसाठी पुढचा काळ अडचणीचा ठरणार आहे. उत्तरायण नुकतेच सुरू झाले असून, राजकीय वातावरणातही बदलाची नांदी असल्याचा इशारा त्यांनी दिला. भाजपाच्या विजयावर भाष्य करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी उपरोधिक शब्दांत टीका केली. "करून घेतलं बोगस मतदान, वाटल्या नोटा, निवडणूक आयोगाच्या मदतीने कमळाबाई बांधते सत्तेचा फेटा," असे म्हणत त्यांनी भाजपाच्या यशावर संशय व्यक्त केला. या आरोपांमुळे राज्यातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, येत्या काळात या मुद्द्यावर राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.